# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल केलेले द्वितीय अपिल क्र.रामाआ नाशिक/द्वितीय अपिल क्र.६५७/२०२२/नाशिक मधील शास्तीचे प्रकरण**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री.दिनकर विष्णू पवार, रा. आनंद बिल्डींग, फ्लॅट नं. २०४, गजानन पार्क, खर्जूल मळा, चेहेडी, नाशिकरोड, ता. जि. नाशिक ४२२१०१ | उप अभियंता, नगरनियोजन विभाग, नाशिक महानगरपालिका, राजीव गांधी भवन, शरणपूर रोड, नाशिक ता.जि.नाशिक. | सहाय्यक संचालक, नगरनियोजन विभाग, नाशिक महानगरपालिका, राजीव गांधी भवन, शरणपूर रोड, नाशिक ता.जि.नाशिक. |

## विवेचन

उपरोक्त द्वितीय अपिल संदर्भात अपिलार्थी यांनी दिनांक ०८/०९/२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये १)नाशिक मनपा हद्दीतील पाथर्डी शिवार सर्व्हे नं.३/२, ३/३ व ३/४ सदर क्षेत्रात पावसाळी पाण्याचा व क्षेत्रात लागून असे दोन पावसाळी पाण्याचे नाले आहे ते दोन्ही नाले बुजवून लेवल करणेत आले आहे. त्या क्षेत्राला लागू जो नाला आहे तेथे १२ मिटर जुना देवळाली रोड आहे तो बुजवून लेवल करा असा आदेश मनपा तर्फे देणेत आला आहे. वर नमूद केलेल्या सर्व्हे नं. चा मालकांना देणेत आला आहे. सदर आदेशाची प्रत मिळावी. सदर माहिती अर्जाच्या संदर्भात दाखल उपरोक्त द्वितीय अपिलामध्ये आयोगाने दिनांक २३/०४/२०२४ रोजी सुनावणीअंती खालीलप्रमाणे आदेश पारित केले होते.

"तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगरनियोजन विभाग, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा तात्काळ आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी."

२. आयोगाकडे उपलब्ध कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थी यांचा दि.०८/०९/२०२१ रोजीचा माहिती अर्ज तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नविन नाशिक, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांनी दि.२२/०९/२०२१ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगरनियोजन विभाग, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ६ (३) अन्वये अपिलार्थीस माहिती देण्यासाठी पाठविण्यात आला आहे. त्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगरनियोजन विभाग, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती पुरविल्याचे दिसून येत नाही. तसेच उपरोक्त आदेशास अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगरनियोजन विभाग, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांनी अद्यापपर्यंत आयोगाकडे कोणताही लेखी खुलासा सादर केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहित धरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगरनियोजन विभाग, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये शास्तीची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगरनियोजन विभाग, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांच्याविरुध्द आयोगाच्या मते उपरोक्त विवेचनाच्या पार्श्वभूमीवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २०(१) अन्वये रु.१०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार मात्र) शास्तीची कार्यवाही करण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांनी त्यांच्या वेतनातून समान २ मासिक हप्त्यांत कपात करुन सदर रकमेचा भरणा **“००७०, इतर प्रशासनिक सेवा, (०१) (१८) माहितीचा अधिकार दंड व शुल्क (००७०-०७८९)”** या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही करावी व सदर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर त्याबाबत आयोगास अवगत करावे.

२) प्रस्तुत द्वितीय अपिल क्र.६५७/२०२२/नाशिक अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

**( भूपेन्द्र गुरव )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

स्थळ :- नाशिक
दिनांक :-

---

प्रत :- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
आयुक्त, नाशिक महानगरपालिका, राजीव गांधी भवन, शरणपूर रोड, नाशिक ता.जि.नाशिक.

---

जावक क्र. ७८३२ दिनांक :- 13 OCT 2025